# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

क्रांतीदिनाच्या निमित्ताने मंगळवार, दिनांक 9 ऑगस्ट, 2022 रोजी सकाळी 10.30 वाजता विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसहतीगृह क्रं. 3 च्या पाठीमागील क्रांतीवनातील स्मारकास मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या शुभहस्ते, मा. प्र–कुलगुरू, मा. कुलसचिव व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पचक्र व फुले वाहणेचा कार्यक्रम आयोजित केला आहे. सदर कार्यक्रमानंतर लगेचच आझादी का अमृत महोत्सव या निमित्ताने कांतीवनामध्ये मा. कुलगुरू व इतर मान्यवर यांचे शुभहस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करणेत आलेला आहे. तसेच आझादी का अमृत महोत्सव यानिमित्ताने कांतीवनामध्ये सकाळी 11.00 सामुहिक राष्ट्रगीत गायनाचे आयोजन करणेत आलेले आहे. तरी सदर कार्यकमांसाठी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

संदर्भ क्रं. शिवाजीवि/विद्यार्थी विकास/1003
दिनांक : 04/08/2022

संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

1. सर्व पदव्युत्तर अधिविभागप्रमुखांनी आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी/विद्यार्थ्यीनींना व प्रशासकीय सेवक यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
2. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
3. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी सामुहिक राष्ट्रगीत गायनासाठी कांतीवनामध्ये ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी.
4. विभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत म्हणण्याची व्यवस्था करावी.
5. वाहन विभाग प्रमुख यांनी विभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक कलाकार यांना वाद्ये आणणेसाठी वाहन उपलब्ध करून दयावे.
6. श्री. डी आर चौगुले व श्री. व्ही. डी. चांदणे, जमादार यांनी या समारंभावेळी दोन शिपाई या विभागाच्या शिपायाच्या मदतीस दयावेत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वतः उपस्थित रहावे तसे आदेश आस्थापना विभागाने त्यांना द्यावेत.
7. नोटीस बोर्डवर लावणेसाठी – 1) मुलींचे वसतिगृह क्र. 1 व 2 2) मुलांचे वसतिगृह क्र. 1, 2 व 3 3) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन 4) बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.
8. अभियांत्रिकी व उद्यान विभाग यांनी वरील दिवशी कार्यक्रमाचे ठिकाणी स्वच्छता व वृक्षारोपणाच्या अनुषंगाने इतर आवश्यक कामे करण्यासाठी संबधीत कर्मचारी यांना सुचना दयावी.
9. आझादी का अमृत महोत्सव निमित्ताने शासन निर्देशाने, मा. रेक्टर 1) मुलींचे वसतिगृह क्र. 1 व 2 2) मुलांचे वसतिगृह क्र. 1, 2 व 3, 3) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन व 4) मुलांचे व मुलींचे वसतिगृह, तंत्रज्ञान अधिविभाग यांनी दि. 09 ऑगस्ट, 2022 रोजी सकाळी 11.00 वाजता आपले वसतिगृहामध्ये सामुहिक राष्ट्रगीत गायनाचे आयोजन करावे.

--- 00000---